**अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील विधी निदेशक यांची खालील पदे कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील खाली दर्शविलेल्या ठिकाणी विधी निदेशक यांची पदे ११ महिने कंत्राट पध्दतीने भरावयाची आहेत.

**विधी निदेश (एकूण ८६ पदे)**

| अ.क्र. | प्रशिक्षण केंद्राचे नाव | मंजूर पदे |
|---|---|---|
| १. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ | १० |
| २. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र,खंडाळा | ८ |
| ३. | प्राचार्य, पोलीस पशिक्षण केंद्र, नानविज-दौंड | ८ |
| ४. | प्राचार्य, पोलीस पशिक्षण केंद्र, सोलापूर | १० |
| ५. | प्राचार्य, पोलीस पशिक्षण केंद्र, जालना | १२ |
| ६. | प्राचार्य, पोलीस पशिक्षण केंद्र, अकोला | ९ |
| ७. | प्राचार्य, पोलीस पशिक्षण केंद्र, नागपूर | ११ |
| ८. | प्राचार्य, पोलीस पशिक्षण केंद्र, बाभळगांव,लातूर | १० |
| ९. | प्राचार्य, पोलीस पशिक्षण केंद्र, तुरची तासगाव- सांगली | ८ |
| | एकूण | ८६ |

सुचना- याबाबतचे अर्ज विशेष पोलीस महानिरीक्षक प्रशिक्षण व खास पथके,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे दिनांक २१/११/२०१४ पुर्वी सादर करावेत.

उमेदवाराने सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज लिफाफ्यात घालून उजव्या बाजूला ठळक अक्षरात विधी निदेशक पदासाठी अर्ज असे नमूद करून दिनांक २१/११/ २०१४ पर्यंत अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य,पोलीस मुख्यालय,जुने विधानभवन, शहीद भगतसिंग मार्ग कुलांबा, मुंबई ४०० ००१,{लक्षवेध- विशेष पोलीस महानिरीक्षक प्रशिक्षण व खास पथके} या पत्यावर पोहचेल याची दक्षता घ्यावी. दिनांक २१/११/२०१४ नंतर या कार्यालयांस प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अर्जासोबत पत्र व्यवहाराकरिता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावेत.

टीप.- वर दर्शविलेल्या पदसंख्येत/ नियुक्तीच्या ठिकाणात बदल होण्याची शक्यता असू शकते. त्यामध्ये बदल करण्याचे त्याच प्रमाणे ते रदद् करण्याचेअधिकार हे सक्षम प्राधिका-यास राहतील.

**<u>करारातील मासिक देय रक्कम</u>**

विधी निदेशक या पदाकरिता मासिक देय रक्कम रू.१२,००० +दूरध्वनी व प्रवास खर्चाकरिता रू. ३,००० असे एकूण रू.१५,००० दरमहा देय राहील (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

**<u>शैक्षणिक अर्हता वयोमर्यादा / अनुभव</u>**

१.उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदवीधर असेल. तो सनदधारक असेल.

२.विधी निदेशक पदसाठी वकिली व्यवसायाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

३.उमेदवारास संबंधित पदाच्या प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे परिपूर्ण ज्ञान असेल आणि तो संबंधित कायद्यांचे प्रशिक्षण देण्यास सक्षम असेल.

४.उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

५.विधी निदेशक पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी ३५ वर्षापेक्षा जास्त नसेल.

किंवा

६.जी व्यक्ती शासकीय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी प्रशासकीय व सेवाविषयक कायद्यांविषक सखोल ज्ञान असेल त्याच प्रमाणे मा.सर्वोच्च न्यायलयाने दिलेल्या आदेशनुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**<u>विधी निदेशक यांची कर्तव्य व जबाबदा-या:</u>**

**१.**प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण देणे.

२.पोलीस प्रशिक्षण शाळेत वेळोवेळी होणा-या स्पर्धा परीक्षा तथा लेखी परीक्षा यासाठी प्रश्नपत्रिका संच तयार करणे. परीक्षा घेणे, उत्तरपत्रिका तपासणे, परीक्षांचा निकाल तयार करणे इ. परीक्षाविषयक बाबीमध्ये विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशिक्षण) व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण शाळा यांना मदत करणे.

३.पोलीस प्रशिक्षणाविषयक सर्व बाबी तथा वेळोवेळी नेमून दिलेली कामे.

**<u>अटी व शर्ती:</u>**

१.सदर पदांची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. उमेदवाराला शासकीय कर्मचारी /अधिकारी म्हणून गणले जाणार नाही.

२.सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथम ११ महिन्यासाठी करण्यात येतील. ११ महिन्यांनंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी (जास्तीत जास्त ३ वेळा, ११महिन्यांकरिता ) वाढविता येईल. ३ वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही अशा उमेदवाराची पुनश्च: नियुक्ती करणे आवश्यक आहे असे, सक्षम प्राधिका-याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च: निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

३. निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकिली व्यावसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसाय नियुक्ती प्राधिका-याच्या लेखी परवानगीशिवाय करू शकणार नाही. जर नियुक्ती प्रधिका-यांने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरू ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा अर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४.उमेदवारांची निवड मुलाखतीव्दारे करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक उमेदवरांना नंतर कळविण्यात येईल.

५.उमेदवाराला कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

६. नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement) भरणे अनिवार्य राहील.

७. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या अधिकारी/कर्मचा-यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरिक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

८.उमेदवारांनी वर विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी दिनांक २१/११/२०१४ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.

९.अर्जासोबत २.५ से.मी.x२.५से.मी.आकाराचे सध्याचे काढलेले २ रंगीत फोटो जोडावेत.

अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी, श्री./सौ./कु.------------------------------------------------यादवारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/ करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे.जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे.अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड /नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही.अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन.तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :

दिनांक : अर्जदाराची सही

(दिनांकासह)

**सोबत:- अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणिक केलेल्या छायांकित प्रती.**

मुंबई, दिनांक ०७ नोव्हेंबर २०१४ ------------

**मधुकर पांडे**
**विशेष पोलीस महानिरीक्षक**
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता